मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सोसायटीधारकांच्या पाण्याची 'हमी' कोण घेणार?

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा सवाल

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी ।**

महापालिका बांधकाम विभागातील उदासीनतेमुळे शहरातील सोसायटीधारक नागरिकांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागत आहे. विकासकाला बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देताना पाणी पुरवठ्यासह अन्य सोयी-सुविधांसाठी हमीपत्र लिहून घेतले जाते. मात्र, त्याची काटेकोर अंमलजावणी होत नाही. मग, सोसायटीधारकांच्या पाण्याची 'हमी' कोण घेणार? असा सवाल भाजपा आमदार महेश लांडगे यांनी उपस्थित केला. चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनच्या पुढाकाराने शहरातील सोसायटीधारकांच्या पाणीपुरवठ्याबाबत महापालिका भवनातील आयुक्त दालनात बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे व पदाधिकारी



व बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. संजीवन सांगळे म्हणाले की, महापालिका हद्दीतील बांधकाम व्यवसायिकाकडून जोपर्यंत भामा आसखेडचा टप्पा क्रमांक पाच आणि सहा पूर्ण होऊन पूर्ण क्षमतेने सोसायटी धारकांना पाणी पुरवणार नाही. तोपर्यंत विकसक सोसायटी धारकांना स्वखर्चाने पाणी पुरवतील, असे हमीपत्र विकासकांच्या प्रकल्पाला बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देताना लिहून दिले जाते. परंतु, कोणताही विकसक स्वखर्चाने सोसायटीला पाणी पुरवत नाही.

> **"हमीपत्राप्रमाणे बांधकाम व्यावसायिक पाणीपुरवठा करत नसतील आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाही पाणीपुरवठा करत नसेल, तर हा सोसायटीधारकांवर अन्याय आहे. त्यामुळे हे सर्व सोसायटीधारक लोकप्रतिनिधी म्हणून आमच्याकडे येतात. त्यामुळे आयुक्तांनी या बांधकाम व्यवसायिकाकडून हमीपत्र लिहून घेताना काळजी घ्यावी तसेच सोसायटीधारकांना एक तर बांधकाम व्यवसायिकांनी किंवा महानगरपालिकेने पाणी पुरवावे. आजपर्यंत सोसायटीधारकांनी विकत पाणी घेतलेले आहे त्या पाण्याबद्दल प्रशासनाने तोडगा काढून सोसायटीधारकांना न्याय द्यावा, अशी सूचना प्रशासनाला केली आहे.**
>
> **– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

असे हमीपत्र लिहून देऊन त्याचे उल्लंघन करणाऱ्या विकासावर कलम २०० नुसार माननीय आयुक्तांनी फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही सांगळे यांनी केली. बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेताना विकसकाने महानगरपालिकेला हमीपत्र लिहून दिल्यानंतर त्या विकसकाने सदनिका धारकांच्या बरोबर करारनामा करताना त्यामध्ये सदनिका धारकांनी स्वतः पाणी खरेदी करावे असे लिहून घेऊ नये. महानगरपालिकेकडे पुरेसे पाणी नसेल किंवा इतर मूलभूत सुविधा नसतील तर यापुढे कोणत्याही बांधकाम व्यवसायिकास बांधकाम परवाने देऊ नयेत. ज्या बांधकाम व्यावसायिकांनी पार्ट कम्प्लिशन, भाग पूर्णत्वाचा दाखला घेतला आहे. ग्राहकांच्या करारनाम्यामध्ये लिहून दिलेल्या गोष्टींची पूर्तता केली नसताना देखील, महानगरपालिकेच्या नियमाची पूर्तता केलेली नसताना देखील, भाग पूर्णत्वाचे दाखले दिलेले आहेत अशा सर्व गृह प्रकल्पाची यादी फेडरेशनकडून माननीय आयुक्तांना दिली जाईल. एकच विकासक अनेक गृहप्रकल्पामध्ये हमी पत्राचे वारंवार उल्लंघन करत असेल, तर प्रशासनाने तात्काळ कारवाई केली पाहिजे, अशी मागणी फेडरेशनच्या माध्यमातून करण्यात आली. यावर कायदेशीर बाजुंची पडताळणी करुन निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन आयुक्त सिंह यांनी दिले आहे.

# लेकीचे स्वागत करून नवचैतन्याचा विचार मांडा : चाकणकर

## इंद्रायणी सखी मंगळागौर स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

गर्भापासून मृत्यूपर्यंत महिलांचा संघर्ष सुरूच असतो. म्हणून एक पाऊल पुढे नेत आपला विचारांचा लढा आपण द्यायचा आहे. माझ्या गर्भात मुलगा असो की मुलगी त्याला जन्म देण्याचा अधिकार मातृत्वाने मला दिला आहे. हे सासरच्या मंडळींना आपण ठणकावून सांगायचे आहे.

अशा भावना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी मांडल्या. जन्माला येणाऱ्या लेकीचे प्रत्येकाने स्वागत करून नवचैतन्याचा विचार मांडा असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. मोशी येथील लक्षवेध स्पोर्ट्स फाउंडेशन



> "राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून काम करताना महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर या आम्हा तमाम महिलांसाठी एक आदर्श आहे. मंगळागौर हे एक निमित्त आहे. महिला भगिनींना एकत्र करणे त्यांना क्षणभराचा विरंगुळा देऊन त्यांच्या विचारांची आदान प्रदान व्हावी. त्यांना एक व्यासपीठ मिळावे असा हेतू यामागे आहे.
>
> **-प्रा. सौ. कविता आल्हाट,**
> राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला शहराध्यक्ष

आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला शहराध्यक्ष प्रा. सौ. कविता आल्हाट यांच्यावतीने इंद्रायणी सखी मंगळागौर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चाकणकर बोलत होत्या. कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे माजी महापौर मोहिनी लांडे, राजमाता प्रतिष्ठानच्या अध्यक्षा वैशाली गव्हाणे, माजी नगरसेविका संगीता ताम्हणे, संजय उदावंत, युवा नेते अक्षय बारणे, शहर कार्याध्यक्ष कविता खराडे, स्वयंरोजगार प्रदेश अध्यक्षा मेघा पवार, संगीता आहेर, पुष्पा शेळके, शीला भोंडवे, पूनम वाघ, ऐश्वर्या पवार आदी उपस्थित होते. चाकणकर पुढे म्हणाल्या, महिला भगिनींच्या जीवनात कितीही त्रास असला, वेदना असल्या तरीही जिथे आम्हाला आमचा परफॉर्मन्स द्यायचा आहे,तिथे तो आम्ही चांगलाच देणार ही शक्ती महिलांमध्ये आहे. स्त्रीमध्ये मातृत्व आहे, दातृत्व आहे. नवीन सृष्टी निर्माण करण्याची ताकद याच मातृत्वात असते. कोणत्याही नवनिर्मितीचा विचार हा याच मातृत्व शक्तीच्या गर्भातून प्रेरणा घेत असतो. नऊ महिने नऊ दिवस एका गर्भाला सांभाळणे आणि त्याला जन्म देणे ही खूप मोठी गोष्ट आहे. बाळंत कळा काय असतात हे एक स्त्रीच समजू शकते .यातील एक कळ पुरुष सहन देखील करू शकणार नाही. त्यामुळे मातृत्व ही फार मोठी शक्ती आहे. काही कारणास्तव आपण ऐकत राहतो शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. पण तुम्ही कधी ऐकलं आहे का शेतकरी महिलेने आत्महत्या केली. महिला असे टोकाचे पाऊल कधीच उचलणार नाही. ती निर्धाराने, खंबीरपणे कोणत्याही परिस्थितीत उभी राहते. पदर खोचते आणि कामाला लागते. आपल्या सोबत आपल्या मुलाबाळांनाही मोठे करते. ही ताकद मातृत्व शक्तीमध्ये आहे .या शक्तीचा सन्मान करणे आपली जबाबदारी आहे असे चाकणकर यावेळी म्हणाल्या.

# वाहतुकीसाठी सुसज्ज रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेचा प्रयत्न : आयुक्त

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

## रस्ते हे कोणत्याही शहराच्या प्रगतीचे मानस

पिंपरी चिंचवड शहरातील रहदारी विचारात घेऊन रस्ते विकसित करणे हे महापालिकेचे उद्दिष्ट्य आहे. पादचारी मार्ग, सायकलस्वारांसाठी सायकल मार्ग, सार्वजनिक वाहतुकीसाठी सुसज्ज रस्ते या सर्व सुविधा नागरिकांना उपलब्ध होतील असा महापालिकेचा प्रयत्न आहे. अर्बन स्केपिंग डिझाईननुसार महापालिकेच्या वतीने नागरिकांसाठी तसेच लहान मुलांसाठी शहरात ठिकठिकाणी सायकल ट्रॅक उभारण्यात आले असून नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. भारतीय रस्त्यांची सध्याची परिस्थिती बघता प्रोजेक्ट दिशा प्रस्तावित करण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे रहदारी कमी होण्यास मदत होणार




असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. पिंपरी चिंचवड महानगरपालिका करीत असलेल्या विविध रस्त्यांची अर्बन स्ट्रीट स्केप डिझाईन विषयासंदर्भात माहिती सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रसिद्धी माध्यम प्रतिनिधींसाठी चिंचवड येथील ऑटो क्लस्टर येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त सिंह बोलत होते. या कार्यशाळेस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, सह शहर अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, उप आयुक्त रविकिरण घोडके, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, संध्या वाघ, प्रेरणा सिनकर, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, वास्तुविशारद प्रसन्न देसाई, प्रांजली देशपांडे, प्रताप भोसले, विकास ठाकर तसेच विविध प्रसिद्धी माध्यमांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. आयुक्त शेखर सिंह म्हणाले, शहरातील जुन्या झालेल्या वाहतुकीच्या दळण-वळणामध्ये काही बदल करावे लागणार आहेत. महापालिका शहरातील रहदारी कमी करण्यासाठी अनेक उपाययोजना राबवित आहे पण या उपाययोजना राबवित असताना नागरिकांचा प्रतिसाद मिळणेही तितकेच गरजेचे आहे. हरित सेतू हा महापालिकेचा एक अनोखा प्रकल्प आहे ज्याचा जागतिक पातळीवर नामोल्लेख झाला आणि ब्लूमबर्ग इनिशिएटीव्ह फॉर सायकलिंग इन्फ्रास्ट्रक्चर पुरस्काराने महापालिकेला सन्मानित करण्यात आले. जगभरातील ६६ देशांमधून आलेल्या २७५ अर्जांची काटेकोरपणे तपासणी झाल्यानंतर पिंपरी चिंचवड शहराची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली ही शहरासाठी अभिमानाची बाब आहे. शहरातील फुटपाथवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी महापालिकेच्या वतीने सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात एक विशेष मोहीम राबविण्यात येणार असून या मोहीमेनंतर नागरिकांना फुटपाथचा वापर करणे अधिक सोयीस्कर होणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा शेखर सिंह यांनी दिली.

### नागरिकांमध्ये जागृती करणे गरजेचे

» अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे म्हणाले, रस्ते हे कोणत्याही शहराच्या प्रगतीचे मानस असतात. सुसज्ज रस्त्यांवरुन शहराच्या विकासाची ओळख होत असते. रस्त्यांची रचना, रुंदी, पदचारी मार्ग तसेच सायकल मार्ग या गोष्टींचा विचार करून रस्त्यांची निर्मिती केली जाते. नागरिकांच्या सोयीमध्ये रस्ता हा मोठा प्रभाव टाकणारा घटक असतो. रस्त्यावरील सायकल मार्ग किंवा फुटपाथचा वापर होत नसेल आणि त्यावर अतिक्रमण होत असेल तर नागरिकांमध्ये याबाबत जागृती करणे गरजेचे आहे, असे सांगून यासाठी महापालिकेस माध्यमांनीही सहकार्य केले पाहिजे जेणेकरून रहदारी कमी होण्यास मदत मिळेल आणि नागरिक जवळच्या ठिकाणी जाण्यासाठी वाहनाचा वापर करण्याऐवजी पादचारी मार्ग किंवा सायकल मार्गाचा वापर करतील, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

# गुरुवर्य अ‍ॅकॅडमी स्कुलचा पोलिस कर्मचाऱ्यांसमवेत रक्षाबंधन!

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

## ५ ते ८ वीच्या विद्यार्थीनींनी मान्यवरांना राख्या बांधून साजरा केला सण

बहिणभावाच्या पवित्र नात्याचा सण म्हणजे रक्षाबंधन. मात्र सदैव 'ऑन ड्युटी ' असलेल्या सैन्य दलातील जवानांना आणि पोलिस कर्मचाऱ्यांना रक्षाबंधनासह इतर सण साजरे करता येत नाहीत. बुधवार दिनांक ३० ऑगस्ट रोजी रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून गणेशनगर, चिखली येथील गुरुवर्य अ‍ॅकॅडमी स्कुलचे संस्थापक भूषण मावळे आणि मुख्याध्यापिका ज्योत्स्ना मावळे मॅडमयांच्या वतीने पोलिस कर्मचाऱ्यांसमवेत





रक्षाबंधन उत्साहात साजरे करण्यात आले. शाळेतील इयत्ता ५ ते ८ वीच्या विद्यार्थीनींनी मान्यवरांना राख्या बांधून हा पवित्र सण साजरा करण्यात आला. आपत्कालीन परिस्थिती नियंत्रित आणण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या आणि कायदा-सुव्यवस्था राखणाऱ्या पोलिसांप्रती आपुलकी व आदरयुक्त भावना व्यक्त करण्यासाठीचा तसेच सामाजिक बांधिलकी जपण्यासाठीचा शाळेचा हा एक प्रयत्न असल्याचे शाळा व्यवस्थापनाने स्पष्ट केले.

### कार्यक्रमाला यांची होती उपस्थिती...

» याप्रसंगी पोलिस निरिक्षक राजेंद्र बर्गे, पोलिस उपनिरिक्षक राजेंद्र वर्गे, पोलिस हवालदार नवनाथ कुळे, पोलिस नाईक सदाशिव शिंदे, अमर कांबळे, महिला पोलिस हवालदार शिंदे (दामिनी पथक),महिला पोलिस नाईक भाग्यश्री आहेर (दामिनी पथक) आदि मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे सुत्रसंचालनन रोहिणी गोडगे यांनी केले, तसेच मुख्याध्यापिका जोत्स्ना मावळे मॅडम यांनी आभार प्रदर्शन करून या उपक्रमाचा समारोप करण्यात आला.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी पुणे लोकसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात?

## पुण्याचे भाग्य उजळणार असल्याचा भाजप नेत्यांचा दावा

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** आगामी लोकसभा निवडणुकीत जास्तीत जास्त जागा मिळवण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने पक्षाची तयारी देखील सुरू झाली आहे. मात्र, त्यातच भाजप एक मास्टर स्ट्रोक खेळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुणे लोकसभा मतदार संघातून निवडणुकीला उतरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसे झाल्यास महाराष्ट्र भाजपला मोठा फायदा होण्याचीही शक्यता आहे. देशात पुढील वर्षी लोकसभा निवडणूका येऊ घातल्या आहेत. त्यासाठी भाजपसह इतर पक्षांनी निवडणुकांची जोरदार तयारी सुरु केली आहे. एनडीए सह इंडिया आघाडीच्या बैठकांचे सत्र सध्या महाराष्ट्रात सुरु आहे. अशातच आता पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पुण्यातून लोकसभा निवडणूक लढवणार असल्याची चर्चा सुरु झाल्याने निवडणुकीची रंगत चांगलीच वाढणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुणे लोकसभा मतदार संघावून निवडणूक लढवावी यासाठी भारतीय जनता पक्षाचे नेते संजय काकडे यांनीच मोदींना एक पत्र लिहिले आहे. त्या पत्रात त्यांनी मोदींनी पुणे लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवण्याची मागणी केली आहे.



या संदर्भात बोलताना संजय काकडे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्यातून निवडणूक लढवली तर इतिहासात नसेल झाला इतका मोठा प्रचंड विजय आम्ही पुण्यातून मिळवून देवू. सर्व विरोधकांचे डिपॉजिट आम्ही जप्त करू, असा दावा देखील संजय काकडे यांनी केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या वाराणसी मतदार संघातून खासदार आहेत. आपल्या व्यस्त कार्यक्रमात देखील ते आपल्या मतदारसंघासाठी वेळ काढतात. त्यामुळे वाराणसी शहराचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. ते पाहाता जर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्यातून निवडणूक लढवली तर राज्यातील ४८ पैकी ४८ खासदार भाजपचे निवडून येतील. राज्याचे आणि पुण्याचे भाग्य उजळेल, असा विश्वास संजय काकडे यांनी व्यक्त केला आहे. पुणे लोकसभा मतदार संघावर काँग्रेसचा दावा सांगितला जात आहे. त्यामुळे काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी आधीच या मतदार संघातून निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी जर निवडणुकीच्या रिंगणात असतील तर आपण त्यांच्या विरोधात निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यात तयार असल्याचे धंगेकर यांनी म्हटले आहे.

### संजय काकडे यांचे मोदींना पत्र

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुणे लोकसभा मतदार संघावून निवडणूक लढवावी यासाठी भारतीय जनता पक्षाचे नेते संजय काकडे यांनीच मोदींना एक पत्र लिहिले आहे. त्या पत्रात त्यांनी मोदींनी पुणे लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढवण्याची मागणी केली आहे. या संदर्भात बोलताना संजय काकडे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्यातून निवडणूक लढवली तर इतिहासात नसेल झाला इतका मोठा प्रचंड विजय आम्ही पुण्यातून मिळवून देवू. सर्व विरोधकांचे डिपॉजिट आम्ही जप्त करू, असा दावा देखील संजय काकडे यांनी केला आहे.

# पुण्यात महावितरणची धडक कारवाई!

## ड्रोनच्या सहाय्याने महावितरणने पकडली २ कोटींची वीजचोरी

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** वीजबिलाच्या थकबाकीसाठी बंद केलेल्या मीटरला बायपास करुन उच्चदाबाच्या रोहित्राला थेट मोठी केबल जोडून वीजचोरी करणाऱ्या चोराचा महावितरण केडगाव विभागाने ड्रोनच्या सहाय्याने छडा लावला आहे. मुकेश अगरवाल असे या वीजचोराचे नाव असून त्यास महावितरणने २ कोटी ४ लाखांचा दंड ठोठावला आहे. याप्रकरणी शिक्रापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सणसवाडी (ता. शिरुर) येथे मुकेश ओमप्रकाश अगरवाल (रा. अग्रसेन सोसायटी, कोरेगाव पार्क, पुणे) यांच्या मालकीच्या तीन वेगवेगळ्या कंपन्या आहेत. पैकी मे. थर्मो लाईट पॅकेजिंग इंडिया प्रा.लि व मे. प्रकाश करुगेटेड पुणे प्रा.लि ह्या दोन उच्चदाबाचे तर मे. भगवान ट्यूब प्रा.लि. हे लघुदाब ग्राहक आहेत. तिन्ही कंपन्या एकाच आवारात व शेजारी-शेजारी आहेत. यामध्ये प्रामुख्याने थर्माकोल व पुठ्ठा बनविण्याचे काम होते. मे. थर्मोलाईट पॅकेजिंग इंडिया प्रा.लि या ग्राहक जोडणीचा वीजपुरवठा कायमस्वरुपी बंद केला होता तर इतर दोन वीजजोडण्यांचा वीजपुरवठा देखील थकबाकीच्या कारणास्तव तात्पुरता बंदच आहे. महावितरणने वीजपुरवठा बंद केलेला असतानाही वीजपुरवठ्यासाठी उभारण्यात आलेल्या उच्चदाब रोहित्रातून



थेट वीजपुरवठा सुरु केल्याची माहिती केडगावचे कार्यकारी अभियंता संदीप दरवडे यांना खबऱ्यामार्फत मिळाली. सदरची वीजचोरी मोठी असल्याने व संबंधित ग्राहकाने गेटवर बंदोबस्त लावून आत जाण्यास मज्जाव केल्याने दरवडे यांनी ही बाब मुख्य अभियंता सुनिल पावडे यांच्या कानावर घातली. तेव्हा मुख्य अभियंता पावडे यांनी वीजचोरी उघडकीस आणण्यासाठी ड्रोनची मदत घेण्यास सांगितले. संदीप दरवडे आठ जणांच्या पथकासह गेले. कुरिअर पार्सल देण्याच्या निमित्ताने एका दुचाकीवरुन त्यांनी एका मित्राच्यासह आत प्रवेश मिळवला. पुराव्यासाठी ड्रोनद्वारे चित्रिकरण सुरु केले व तोच बाहेर दबा धरुन बसलेल्या टीमने ओळखपत्र दाखवून आत प्रवेश केला आणि वीजचोरीचा पर्दाफाश केला. मे. प्रकाश करुगेटेड पुणे प्रा.लि या ग्राहकाला ४७३२९० युनीट वीजचोरी पोटी १ कोटी ११ लाख १९ हजार ८५७, मे. थर्मो लाईट पॅकेजिंग इंडिया प्रा.लि. या ग्राहकाला २०५६०६ युनीट चोरीचे ५१ लाख ३४ हजार ९७० तर मे.भगवान ट्यूब प्रा.लि या ग्राहकाला २३४९६१ युनीट चोरीसाठी ४२ लाख २५ हजार १६४ रुपये असे तीन ग्राहकांचे मिळून २ कोटी ४ लाख ७९ हजार ९८८ रुपये दंडाचे बील कंपनीचे मालक मुकेश ओमप्रकाश अगरवाल यांना देण्यात आले आहे. तसेच कार्यकारी अभियंता दरवडे यांच्या फिर्यादीवरुन भारतीय विद्युत अधिनियम २००३ कलम १३५ व १३८ नुसार शिक्रापूर पोलिस ठाण्यात वीजचोरीचा व वीज यंत्रणेस छेडछाड केल्याचा गुन्हा सुद्धा दाखल करण्यात आला आहे. मुख्य अभियंता सुनिल पावडे, अधीक्षक अभियंता म्हसू मिसाळ यांचे मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंता संदीप दरवडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता किशोर शिंदे, उपकार्यकारी अभियंता नितीन महाजन, सहा. अभियंता गौरी काळंगे व बाळासाहेब टेंगले, कनिष्ठ अभियंता शीकांत ताटीकोंडा, जनमित्र विश्वनाथ किंदरे व ज्ञानेश्वर आहिरकर यांनी ही कामगिरी यशस्वी केली.

# मूग, उडिद पीकाकरिता नुकसान भरपाई!

## जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी जारी केले आदेश

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
प्रधानमंत्री पीक वीमा योजना खरीप हंगाम २०२३ योजनेअंतर्गत हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे झालेले नुकसान या जोखमीच्या बाबीअंतर्गत शिरुर तालुक्यातील अधिसूचित पीकविमा क्षेत्रातील मूग आणि उडिद पीकाकरिता संभाव्य विमा नुकसान भरपाई रक्कमेच्या २५ टक्के आगाऊ रक्कम विमाधारक शेतकऱ्यांना अदा करण्याचे आदेश एचडएफसी इरगो जनरल इन्शुरन्स विमा कंपनी, मुंबई यांना जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी जारी केले आहेत.



तीव्र दुष्काळ स्थिती, पावसातील ३-४ आठवड्यापेक्षा जास्त खंड आल्याने एकूण पावसाचे कमी झालेले प्रमाण, तापमानातील असाधारण घट-वाढ (दीर्घकालीन सरासरीच्या तुलनेत २० टक्क्यापेक्षा जास्त तफावत), पर्जन्यमानातील असाधारण कमी-जास्त प्रमाण (दीर्घकालीन सरासरीच्या तुलनेत २० टक्क्यापेक्षा जास्त तफावत), मोठ्या प्रमाणात कीड, रोग यांचा प्रादुर्भाव (पीक पेरणी क्षेत्राच्या २५ टक्के पेक्षा जास्त क्षेत्रावर तीव्र प्रादुर्भाव) व इतर नैसर्गिक आपत्ती, पूर, परिस्थिती ज्यामुळे एकूण पीक पेरणी क्षेत्राच्या २५ टक्के पेक्षा जास्त क्षेत्र बाधित होणे या प्रातिनिधीक सूचकांच्या आधारे नुकसान भरपाईबाबत अधिसूचना निर्गमित करण्याची तरतूद आहे.

पर्जन्यातील असाधारण कमी/जास्त प्रमाण (दीर्घकालीन सरासरीच्या तुलनेत २० टक्क्यापेक्षा जास्त तफावत) या प्रातिनिधीक सूचकाच्या आधारे राज्य शासनाचे अधिकारी आणि विमा कंपनी प्रतिनिधी यांच्या संयुक्त पाहणीनुसार मूग व उडिद पिकाचे अपेक्षित उत्पादन हे त्या पिकाच्या मागील ७ वर्षाच्या सरासरी उत्पादनाच्या ५० टक्क्यापेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार सदर महसूल मंडळ गटातील सर्व पीक विमाधारक शेतकऱ्यांना संभाव्य नुकसान भरपाई रक्कमेच्या २५ टक्के आगाऊ रक्कम १ महिन्याच्या आत त्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शिरूर तालुक्यातील शिरूर, निमोणे, रांजणगाव गणपती महसूल मंडळ गट आणि टाकळी हाजी, मलठण या मूग पिकासाठी अधिसूचित महसूल मंडळ गटात; तसेच पाबळ, मलठण, तळेगाव ढमढेरे, कोरेगाव भिमा, टाकळी हाजी या उडिद पिकासाठी अधिसूचित महसूल मंडळात हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे ५० टक्क्यापेक्षा अधिक नुकसान झाल्याचे आढळून आले आहे.

### ९०.५९ टक्क्याची घट

**» मूग पिकाच्या अनुषंगाने शिरूर, निमोणे, रांजणगाव गणपती महसूल मंडळ गटामध्ये मागील ७ वर्षाची सरासरी उत्पादकता ४५४.८ किलो प्रतिहेक्टरी असून संयुक्त सर्वेक्षणानुसार ४२.९४ किलो प्रतिहेक्टरी उत्पादन अपेक्षित असून सरासरी उत्पादनाच्या तुलनेत सुमारे ९०.५९ टक्क्याची घट दिसून येत आहे. टाकळी हाजी, मलठण महसूल मंडळ गटात ४१६.९६ किलो प्रतिहेक्टरी सरासरी उत्पादकतेच्या तुलनेत संयुक्त सर्वेक्षणानुसार ४६.१० किलो प्रतिहेक्टरी उत्पादन अपेक्षित असून सरासरी उत्पादनाच्या तुलनेत सुमारे ८८.९४ टक्क्याची घट दिसून येत आहे.**

# पुण्यात राहत असलेल्या १९ बांग्लादेशी नागरिकांची धरपकड!

## विनापरवाना करत होते वास्तव्य

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागास बुधवार पेठेतील वेश्या गल्लीतील कुंटनखान्यात बेकायदेशीर महिला व पुरुष राहत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांचे पथकाने छापेमारी करुन दहा महिला व नऊ पुरुष अशा एकूण १९ जणांना अटक केली आहे. याप्रकरणी फरासखाना पोलिस ठाण्यात संबंधित आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

सामाजिक सुरक्षा पथकास माहिती मिळाली होती की, बांग्लादेशातून विनापरवाना कोणत्याही वैध कागदपत्राशिवाय तसेच भारत-बांग्लादेश सीमेवरील



मुलकी अधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीशिवाय बांग्लादेशातून दहा मुली व नऊ पुरुष यांनी भारतात अनाधिकृत प्रवेश केला आहे. तसेच बुधवार पेठेतील वेश्या गल्लीत ते अनाधिकृतपणे वास्तव्य करत असून त्यांच्याकडे भारतीय नागरिकत्व शाबीत करणारे कोणतेही दस्ताऐवज नसल्याचे व ते बांग्लादेश येथील नागरिक असल्याचे निष्पन्न झाल्याचे आढळून आल्याने सामाजिक सुरक्षा विभागाचे पोलिस अधिकारी व पोलिस कर्मचारी यांनी छापा टाकून १९ जणांना ताब्यात घेतले. त्यांच्यावर याप्रकरणी पोलिस ठाण्यात पारपत्र अधिनियम १९५० चे कलम तीन सह ६, परकीय नागरिक आदेश १९४८ चा नियम ३ (१) सह परकीय नागरिक कायदा १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ताब्यात घेतलेल्या दहा बांग्लादेशी महिला या वेश्याव्यवसाय करत होत्या व नऊ बांग्लादेशी पुरुष हे वेगवेगळे व्यवसाय करत होते. त्यांना पुढील कायदेशीर कारवाईकरिता फरासखाना पोलिस ठाण्याचे ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कारवाई पुणे पोलिस आयुक्त रितेश कुमार, सहपोलिस आयुक्त संदीप कर्णिक, अपर पोलिस आयुक्त रामनाथ पोकळे, पोलिस उपायुक्त अमोल झेंडे यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे वपोनि भरत जाधव, सपोनि अनिकेत पोटे, सपोनि राजेश माळेगावे, पोलिस अंमलदार राजेंद्र कुमावत, बाबासो कर्पे, तुषार भिवरकर, मनिषा पुकाळे, अमेय रसाळ, सागर केकाण, अमित जमदाडे यांनी केली आहे.

# टास्कच्या नादात मुलाने दिला रेल्वेखाली जीव!

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
दिवसेंदिवस मोबाईलचा अतिवापर मुलांमध्ये वाढत असून त्याचे दुष्परिणाम दिसून येत आहे. वेगवेगळ्या गेमच्या माध्यमातून मुले त्याच्या आहारी देखील गेली असून अशाचप्रकारे एक दहावीतील मुलगा ऑनलाइन गेम खेळताना टास्क पूर्ण करण्याचे नादात त्याने रात्रीच्या वेळी रेल्वे ट्रॅकवर येऊन रेल्वे समोर उभे थांबत जीव देऊन टास्क पूर्ण केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे.

देव संजयकुमार (वय-१५,रा.देहूरोड,पुणे) असे आत्महत्या केलेल्या मुलाचे नाव आहे. याप्रकरणी रेल्वे पोलिसांनी अक्समात मयतचा गुन्हा दाखल केला आहे. रेल्वे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, देव संजयकुमार हा मुलगा देहूरोड येथील लष्कराचे केंद्रीय विद्यालयात इयत्ता दहावीचे वर्गात शिकत होता. बुधवारी रात्री साडेदहा वाजण्याचे सुमारास तो घरात कोणाला काही न सांगता, घराबाहेर पडला आणि थेट देहूरोड रेल्वे स्थानका जवळ गेला. त्याठिकाणी रेल्वे ट्रॅकवर उभा राहून त्याने रेल्वेखाली जीव दिला. अचानक अशाप्रकारे त्याने जीव दिल्याने याबाबतचा तपास रेल्वे पोलिसांनी केला असता, धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. त्याचे मोबाईलमध्ये गेमिंगचा एक टास्क दिसून आला असून तो पूर्ण करण्यासाठी त्याने संबंधित कृत्य केल्याचे निष्पन्न झाले आहे.